The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत साहित्य आणि मूल्यविचार

प्रो. डॉ. एम. बी. धोंडगे
मराठी विभागप्रमुख, श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा

**प्रस्तावना**

काळ जसजसा बदलत गेला माणसाच्या जीवनातही अनेक बदल होत गेले. आजची पिढी ही आधुनिक तंत्रज्ञानाच्या सानिध्यात वाढत चाललेली आहे. हातातल्या मोबाईल पासून ते अनेक प्रकारच्या यंत्रापर्यंत नवी पिढी स्वतःला गुरफटून घेत असल्याचे दिसते या सर्व यंत्र जंजाळात माणसाच्या आयुष्यातील शाश्वत आनंद कुठेतरी हरवून गेल्यासारखा वाटतो मराठी संस्कृतीच्या नावाने आज अनेक लोक गळा काढत आहेत, मात्र ते फक्त सोशल मीडिया सारख्या आभासी जगात... वास्तव जीवनात मात्र संस्कृती नावाची गोष्ट शिल्लक राहिलेली नाही. या आभासी दुनियेतून बाहेर येऊन खऱ्या मानसिक आनंदाची प्राप्ती करण्यासाठी गरज आहे अध्यात्माची. कारण अध्यात्माशिवाय मनशांती लाभणे केवळ अशक्यच आहे. आता आपल्याकडे वेद, उपनिषदे, धार्मिक ग्रंथ, रामायण-महाभारता सारखी महाकाव्ये या गोष्टी समजण्यासाठी संपूर्ण आयुष्य ही कमी पडू शकते प्रत्येक वाक्याचे त्यात अनेक अर्थ निघतात, आणि त्या अर्थाचे पुन्हा नवीन अर्थ निघतात. बरं या स्पर्धेच्या युगात एवढा वेळ आहे कुणाकडे ? परंतु आपल्या संतांनी हे अवघड वाटणारे विषय अतिशय सोप्या शब्दात आपल्या साहित्यातून मांडलेले आहेत. एक प्रकारे ज्ञानाच्या या महासागरात मंथन करून संतांनी हे अमृत साहित्यरूपात आपल्याला दिलेल आहे असे म्हणता येईल. मोक्षप्राप्तीचा मार्ग सांगताना आपल्या अभंग, ओव्या, आणि आपल्या काव्यातून सुखकर जीवनाचा मंत्र या संतांनी आपल्याला दिलेला आहे. ज्याची आधुनिक काळात नितांत गरज आहे.

**संत साहित्याची उपयुक्तता**

महाराष्ट्राला संतांची भली मोठी परंपरा लाभलेली आहे. यात अनेक संतांनी आपले समाज प्रबोधनाचे विचार आपल्या साहित्यातून सामान्य माणसापर्यंत पोहोचविण्याचे कार्य केलेले आहे संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखोबा, संत गोरोबा कुंभार, संत जनाबाई अशी संतांची मालिकाच आपल्या महाराष्ट्रात आहे. या संतांचे साहित्य आजही मानवाला जीवन जगण्यासाठी प्रेरणा देत असतात. यातूनच आपली संस्कृती निर्माण झालेली आहे. आपल्या 'संस्कृतीसंगम' नावाच्या ग्रंथात प्रा. द. के. केळकर यांनी संस्कृती या शब्दाची व्याख्या दिलेली आहे. ते म्हणतात की, 'मनुष्य व्यक्तिशः किंवा समुदायश: जी जीवनपद्धती निर्माण करतो आणि जीवन साफल्याचे स्वतःवर आणि बाह्य विश्वावर संस्कार करून अविष्कार करतो ती पद्धती किंवा तो अविष्कार म्हणजे संस्कृती होय. किंवा 'संस्कार झालेली कृती म्हणजे संस्कृती. असेही म्हणता येईल. मग हे संस्कार कोण करतो? तर विद्वान, पंडित, आणि अभ्यासू माणसाचे हे काम आहे. मात्र संपूर्ण विश्वाची ज्यांना चिंता असते आणि ज्या समाजाच्या कल्याणासाठी ते निस्वार्थपणे कार्य करतात ते आपले संत महंत होय. या संतांनी लोककल्याणासाठी भजन, कीर्तन, भारुडे, अभंग, काव्ये खूप मोठे

साहित्य रचले, ज्यातून जगाला शांतीचा समाधानाचा मार्ग मिळत असतो. आणि हीच संत साहित्याची उपयुक्तता आहे. याची काही उदाहरणे पुढील प्रमाणे...

**संताचे अभंग**

बाराव्या शतकात होऊन गेलेल्या संत ज्ञानेश्वर महाराजांनी भक्ती संप्रदायाची परंपरा सुरू करत, सर्वसामान्यांना सहज उमजेल अशा 'ज्ञानेश्वरी' ग्रंथाची रचना केली. आणि सर्वांना अध्यात्माचा मार्ग सांगितला. समाधी घेण्यापूर्वी ज्ञानेश्वर महाराजांनी लिहिलेला हा अभंग पहा,

**ज्ञानदेव म्हणे विठ्ठलासी |समाधान तूंचिहोसी ||**
**परी समाधीहे तुजपासी | घेईन देवा ||**

ज्ञानेश्वर महाराज विठ्ठलाशी संवाद साधताना असे म्हणतात, तोच सर्वांचा आत्मिक समाधानाचा दुवा आहे. कारण हे समाधान तुझ्याशी एकरूप झाल्यावरच मिळते. तेव्हा मी तुझ्या पाशीच समाधी घेणार आहे. आजच्या काळात समाधानी चित्त कुणाचेच नाही. लोक वरून आनंदी वाटत असले तरी आतून मात्र अनेक चिंतांनी ग्रस्त आहेत. आत्मिक समाधान मिळविण्यासाठी त्या परम परमात्म्याला शरण जाणे (भौतिक गोष्टीत न अडकणे) हा एकमेव उपाय आहे, असे ज्ञानेश्वर महाराज येथे सांगतात.

तुकाराम महाराजांचा हा अभंग पहा..

**घरी रांडा पोरे मरती उपवासी | सांगे लोकापासी थोरपण ||**
**नेऊनिया घरात दाखवावे काय | काळतोंडा जाय चुकाऊनी ||**
**तुका म्हणे आम्ही जाणून त्या प्रमाण | ठकावे हे जन तैसे नव्हो ||**

आजचं आधुनिक जग हे दिखाव याचं सोंग आणणार आहे. लोक इतरांपेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजण्यात धन्यता मानतात. अशा लोकांसाठी तुकाराम महाराज लिहितात की, घरात बायका पोरं उपाशी असतात. मात्र बाहेर श्रीमंतीचा तोरा मिरवणारी माणसे देखील या जगात आहेत. कुणी घरी यायचं म्हटलं तर मात्र अशा लोकांची फसगत होते. त्यामुळे आपण जे आहोत तसेच राहावे. मोठेपणाचा आव आणू नये.

**संतांची भारुडे**

मराठीतील भारुडाची रचना सर्वप्रथम ज्ञानेश्वर महाराजांनी केल्याचे दिसते, आणि त्यानंतर अनेक संतांनी हा काव्यप्रकार हाताळलेला आहे. सामान्य माणसाच्या जीवनाला स्पर्श करणारी भारुडे एकनाथ महाराजांनी लिहिलेली आहेत. आणि त्यातून मोठ्या प्रमाणात समाज प्रबोधनाचे कार्य नाथ महाराज करतात. नाथ महाराजांनी दीडशे विविध विषयांवर साडेतीनशे पेक्षा जास्त भारुडे रचली आहेत. त्यात अनेक प्रबोधनात्मक भारुडे आहेत. जाती व्यवसाय, शारीरिक व्यंग, नातीगोती, सामाजिक वृत्ती दर्शक, देवदैवते, भूत पिशाच्च, पशुपक्षी, सण उत्सव, आणि काही कूट भारुडे ही नाथ महाराजांनी रचलेली आहेत. भारुड या काव्य प्रकारात नाट्य असल्याने ते लोकांना जास्त आवडते. एखादा विषय घेऊन त्याला सामान्य माणसाच्या जीवनाशी जोडला जातो आणि त्याच्या गर्भित अर्थाचा उलगडा करत लोकांना अध्यात्माच्या बाबतीत प्रबोधन केले जाते, असा हा काव्यप्रकार आहे. नाथ महाराजांचे विंचू

चावला, दादला नको ग बाई, रोडगा वाहीन अशी नाट्यात्मक भारुडे आजही लोकप्रिय आहेत. त्यातील हे भारुड पहा...

**'अगं ग ग विंचू चावला | काय मी करू विंचू चावला |**
**काम क्रोध विंचू चावला | तम घाम अंगाशी आला ||धृ||**

इथे 'विंचू' हे रूपक एकनाथ महाराज वापरतात. मात्र हा विंचू काम म्हणजेच वासना आणि क्रोधरुपी आहे. आज लोक अति श्रीमंतीमुळे गर्विष्ठ झालेले दिसतात. पैसा जास्त झाला की त्या व्यक्तीला इतर लोक तुच्छ वाटू लागतात. अशी अनेक उदाहरणे आजच्या समाजात आहे. शिवाय अशी माणसे भोग विलासात रममान होतात. आज मुलांमध्ये देखील वयात येण्याआधीच कामवासणा बळावलेली दिसते. मुलींची छेड काढण्यापासून ते बलात्कारापर्यंतचे प्रकार सर्रास घडताना दिसतात अशा काळात स्त्रियांचे घराबाहेर पडणे ही मुश्किल होऊन गेले आहे. समाज माध्यमातुनही उघड उघड होणारा व्याभिचार मुलांच्या मनावर वाईट परिणाम करत आहे. सगळीकडे मानसिक विकृती बळावत चाललेली आहे. म्हणून नाथ महाराज आपल्या भारुडातून लोकांना सांगतात की, बाबा हो, काम क्रोध अशा विकारांपासून दूर राहा, लांब रहा. हे विकार विंचू चावल्यासारख्या वेदना देतात या क्षणिक सुखातून काहीही निष्पन्न होत नाही. उलट माणूस विनाशाकडे जातो असे ते सुचवितात

**संतांच्या लावण्या**

आजच्या समाजाची मानसिकता इतकी बदललेली आहे की 'लावणी' हा काव्यप्रकार ही लोकांना दोनअर्थी किंवा अश्लील वाटायला लागलेला आहे. अनेक अर्थाने आजची परिस्थिती ही त्याला कारणीभूत आहेच. परंतु लावणीतूनही आध्यात्मिक भाव दिसू शकतो हे आपल्या संतांनी आपल्याला दाखवून दिलेले आहे. लावणी म्हटलं की शृंगार आलाच मात्र त्याचे अंतरंग आध्यात्मिकच असते. ज्ञानेश्वर महाराजांनी रचलेली लावणी पहा...

**'पैल तो गे काऊ कोकताहे, शकुन गे माय सांगताहे |**
**उड उड से काऊ, तुझे सोन्याने मढवीन पाऊ |**
**पाहु णे पंढरीराऊ घरा कै येती |**
**दुधे भरुनी वाटी लावीन तुझे ओठी |**
**सत्य सांगे गोडी विठू येईल काइ |**
**ज्ञानदेव म्हणे जाणिजे खुणे |**
**भेटती पंढरी राणे शकुन सांगे |**

कावळा जर आपल्या घराच्या भिंतीवर बसून ओरडत असेल तर त्याला आपण शुभ संकेत म्हणून ओळखतो. तसेच ज्ञानेश्वरांच्या विरहिणीला पांडुरंग परमेश्वर भेटीचा शकुन कावळ्याच्या ओरडण्यात दिसतो आहे. आत्मा परमात्मा यांचा ऐक्यभाव इथे दिसतो. विठ्ठलाच्या भेटीची ओढ ज्ञानेश्वर महाराजांना लागलेली आहे. देव आणि भक्त यांच्यातील विरहाचे दुःख आणि भेटीची ओढ अशा आध्यात्मिक भावना इथे व्यक्त होताना दिसतात. म्हणून आज आपण मनातून जर भगवंताला स्मरत असू तर तो कोणत्याही रूपाने आपल्याला भेटतो आणि आपले जीवन सार्थक होते, असं या

ठिकाणी ज्ञानेश्वर महाराजांना सुचवायचे आहे. कारण आज भक्तीच्या नावाखाली अनेक अपप्रकार चालू आहेत. मूर्तीवर फुले वाहण्यापासून दूध आणि तेल वाहण्यापर्यंतचे कार्य केले जाते. परंतु सुख, समाधान कुणालाही मिळत नाही. कारण ईश्वर हा मूर्तीत नसून तो मानसात आहे, प्रत्येक जीवात आहे, हे शाश्वत सत्य या लावणीत सांगितलेले आहे.

काही संतांनी आध्यात्मिक आशयाच्या गवळणी ही रचल्या आहेत. त्यात नाथ महाराजांची ही गवळण पहा....

**तुझ्या मुरलीची ध्वनी |अकल्पीत पडली कानी ||**
**विव्हळ झाले अंतकरणी |मी घरधंधा विसरले ||**
**तुझ्या मुरलीची सूरताना| मी विसरले देहभान ||**
**घर सोडूनी धरिले रान |**
**मी वृंदावना गेले ||**
**एका जनार्दनी गोविंदा |पतीतपावन परमानंदा ||**
**तुझ्या नामाचा मज धंदा | वृत्तीत व पदी निवर्तली ||**

या गवळणीत नाथ महाराज एका प्रेयसीच्या मनाची स्थिती दर्शवतात. ती श्रीकृष्णाच्या प्रेमात वेळी झालेली आहे, आणि दिवस-रात्र तिचाच विचार करते आहे. आपले भान विसरून ती केवळ कृष्णाच्याच भक्तीत लीन झाल्याचे दिसते. आधुनिक काळात आपण तमाशातून किंवा चित्रपटातून ज्या शृंगारिक लावण्या ऐकतो किंवा पाहतो, त्यात शृंगारापेक्षा कामवासना चाळवणाराच प्रकार जास्त पाहायला मिळतो. त्यातील लावण्या करणाऱ्या स्त्रियांचे हावभाव आणि शारीरिक हालचाल तरुणांना वासनेच्या गाळात ओढत असल्याचे दिसते. याने आपला समाज काय बोध घेईल? म्हणूनच आज कलेतील रसिकता कमी होऊन उथळपणा आणि माज वाढत चाललेला दिसतो, हे सुजाण वाचकांच्या लक्षात येईल.

संत साहित्यातून मिळणारे शिक्षण, त्यातील उदाहरणे, आणि त्यातील भाव सात्विक वृत्ती वाढविणारे आणि समाजाला दिशा देणारे आहेत. माणसाला हसत खेळत जीवन जगण्याचा मार्ग त्यात आहे. शिवाय समाजाला प्रेरित करून आदर्श समाज निर्माण करण्याची ताकद संत साहित्यात आहे. म्हणूनच आजच्या काळात या संत साहित्याची जास्त गरज आहे, असे वाटते.

**गृहीतके**

१) अभंग, ओव्या, भारुडे, संत काव्य हे प्रत्येक काळात समाजाला प्रगल्भ करण्याचे कार्य करत असतात.

२) संत साहित्यातून सामाजिक शिक्षणासोबतच आदर्श समाज निर्मितीचे उपाय सांगितलेले आहे, जी आजच्या समाजाची गरज आहे.

३) मानवाचे जीवन सुखी करून मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखविणारे संत साहित्य आजच्या समाजासाठी दिशादर्शक आहे.

४) संत साहित्यातून प्रत्येक पिढीला मार्गदर्शन मिळत असते. म्हणून संतांचा मार्ग अवलंबविणे गरजेचे आहे.

**समारोप**

आपल्या संतांनी मोठ्या प्रमाणात साहित्य रचना केलेल्या आहेत आत्मा परमात्मा देवता यांना अध्यात्मिक दृष्टीने संतांनी आपल्या साहित्यात मांडलेले आहे मानवाचे जीवन सुखकर करण्यासाठी या संत साहित्याची गरज आहे त्यामुळे हे संत साहित्य वेगवेगळ्या मार्गाने ( पुस्तके किंवा सोशल मीडिया ) आज नव्या पिढीपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. कारण संत साहित्यातूनच भरकटलेल्या समाजाला दिशा मिळू शकेल, असे म्हणता येईल.

**संदर्भसूची**

१) प्रा. दत्ता भगत - आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद, प्रथम
आवृत्ती, पृष्ठ क्रमांक १३.
२) तत्रैव, प्रस्तावना.
३) बालसंस्कार - संतांचे अभंग, हिंदू जागृती प्रकाशन
४) तुकाराम गाथा - खंड एक, पृष्ठ क्रमांक १४२.
५) शब्दयात्री - संत एकनाथ महाराजांची मूळ रचना व त्याचा भावार्थ, २८ ऑगस्ट २०२२, सोशल मीडिया.
६) प्रा. डॉ. पंढरीनाथ काळे - मराठी तमाशा उगम आणि वाटचाल, लोककला प्रतिष्ठान पुणे, प्रथम आवृत्ती,
पृष्ठ क्रमांक ४५.
७) तत्रैव, पृष्ठ क्रमांक १०५.